# प्रेसनोट दि. १४/०३/२०२३

## बनावट सिगारेट विक्री करणा-या दुकानदारांवर छापे

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात आय.टी.सी.कंपनीचे प्रोडक्ट असलेले गोल्ड फ्लेक सिगारेटची, बनावट गोल्ड फ्लॅक सारखी सिगारेटची वेगवेगळया दुकानामध्ये विक्री होत असले बाबत आय.टी.सी. कंपनीचे अधिकारी यांनी मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांची भेट घेवुन, तक्रारी अर्ज केल्याने, त्याअनुषंगाने मा.पोलीस आयुक्त, यांनी खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अरविंद पवार यांना कारवाई करणे बाबत दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे वपोनि अरविंद पवार यांनी खंडणी विरोधी पथकाचे दोन पथक तयार करुन, आय.टी.सी.कंपनीचे विक्री प्रतिनिधी यांचेसह दिनांक ११/०३/२०२३ रोजी वाकड पोलीस स्टेशनचे हद्दीत मुकेश किराणा स्टोअर्स, फिनेक्स हॉस्पीटल शेजारी, संभाजीनगर काळेवाडीफाटा थेरगाव पुणे व श्री गणेश ट्रेडींग, पवारनगर काळेवाडी फाटा थेरगाव पुणे या दुकानात अचानकपणे छापा टाकुन, मुकेश किराणा स्टोअर्स दुकानातुन आय.टी.सी.कंपनीचे प्रोडक्ट असलेले गोल्ड फ्लेक सिगारेट सारखे **८५,८००/-रुपये किंमतीचे बनावट २६ गोल्ड फ्लॅक सिगारेटचे आऊटर,** प्रत्येक आऊटर मध्ये २० गोल्ड फ्लॅक सिगारेटची पाकीटे तसेच श्री गणेश ट्रेडींग दुकानातुन आय.टी.सी.कंपनीचे प्रोडक्ट असलेले गोल्ड फ्लेक सिगारेट सारखे **९,९००/-रुपये किंमतीचे बनावट ०३ गोल्ड फ्लॅक सिगारेटचे आऊटर, प्रत्येक आऊटर** मध्ये २० गोल्ड फ्लॅक सिगारेटची पाकीटे **असा एकुण ९७,७००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.** मुकेश किराणा स्टोअर्स दुकानाचे मालक मोहनलाल गोमाजी भाटी वय ५१ वर्षे रा. फिनोक्स हॉस्पीटल शेजारी, संभाजीनगर काळेवाडीफाटा थेरगाव पुणे व श्री गणेश ट्रेडींग दुकानाचे मालक गणेश सुवालाल गांधी वय ३४ वर्षे रा.पवारनगर गल्ली नंबर ३ थेरगाव पुणे यांना ताब्यात घेवुन, त्यांचे विरुध्द **वाकड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर २४७/२०२३ भादवि कलम ४१७,४८२,४८३,४८६, ट्रेडमार्क ॲक्ट १९९९ चे कलम १०३, १०४ व कॉपी राईट ॲक्ट १९५७ चे कलम ६३ अन्वये** गुन्हा दाखल केला आहे. नमुद आरोपीतांना पुढील कारवाईकामी वाकड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन हे करत आहे.

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ. संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ. प्रशांत अमृतकर, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे, पोलीस अंमलदार रमेश गायकवाड,सुनिल कानगुडे,प्रदीप गोडांबे,निशांत काळे,किरण काटकर, ज्ञानेश्वर कु-हाडे, विजय नलगे, आशिष बोटके, गणेश गिरीगोसावी, शैलेश मगर, सुधीर डोळस व प्रदीप गुट्टे यांनी केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner